बिडकीन औद्योगिक क्षेत्रात स्थानिकांना रोजगार द्या

शेतकऱ्यांची उद्योगमंत्र्यांकडे मागणी; कौशल्य विकास केंद्राचा नवा पेच

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : सत्तर हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करार झालेल्या बिडकीन औद्योगिक क्षेत्रात कामकाज सुरू करणाऱ्या कंपन्यांमध्ये स्थानिकांना रोजगार मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासमोर केली. या मागणीमुळे कौशल्य विकास केंद्राचा मात्र नवाच पेच निर्माण झाला आहे.

शेतकऱ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने शुक्रवारी बैठकीत अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करताना कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी 'टोएटा किर्लोस्कर' या कंपनीस महाराष्ट्र औद्योगिक वसाहत मर्या. या शासनाच्या कंपनीने मोफत ५० एकर जागा दिली. मात्र, ही जागा देताना कोणताही करार केला नाही. कोणाताही 'हक्क' शासनाकडे राखून ठेवला नाही, याबद्दल उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आश्चर्य व्यक्त केले. मनुष्यबळ विकासासाठी 'डीएमआयसी'ने स्वतंत्र कौशल्य विकास केंद्र प्रस्तावित करावे, अशी सूचना सामंत यांनी केली. अधिकारी मात्र कौशल्य विकासासाठी किर्लोस्कर टोएटा यांना जागा देण्यात आल्याचे सांगत होते. या कंपनीस किती जमीन किती रुपयांना दिली आहे, अशी विचारणा त्यांनी केली. त्यावर जागा मोफत देण्यात आल्याचे सांगण्यात आले. याचा काही करार झाला आहे का, यात शासनाचा हक्क राखून ठेवले आहे का, असे प्रश्नही उद्योगमंत्र्यांनी विचारले.

विविध कंपन्यांना लागणारे मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हावे म्हणून 'डीएमआयसी'ने स्वतःचे कौशल्य विकास केंद्र सुरू करावे, अशी सूचना त्यांनी केली. या कंपनीकडून दरवर्षी १२०० जणांना रोजगार मिळेल, असा दावा केला जात होता. यामुळे आता कौशल्य विकास केंद्र कोणाचे होणार, असा नवा पेच निर्माण झाला आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याबरोबर झालेल्या शेतकऱ्यांच्या बैठकीमध्ये स्थानिकांना रोजगार देण्याची मागणी जोरकसपणे करण्यात आली.

गुंतवणुकीतील कंपन्या कोणत्या?

ह्युंगसंग इंडिया (दक्षिण कोरिया), एन. एस. एम. के. (रशियन), टोयोटा किर्लोस्कर मोटर्स प्रा. लि. (जपान), उजी इन्फोटेक (जपान), ऑरालिकॉन बाल्झर्स (स्विस), कोहलर ग्रुप (अमेरिका), पार्किन्स (यू.के.) तसेच राष्ट्रीय : एथर, जे एस डब्ल्यू पेंट्स, पिरामल फार्मा, कॉस्मो फिल्म्स, ए सी जी कॅप्सूल, वॉरेन रेमेडीज इ. कंपन्यांचा समावेश आहे. शेंद्रा येथे १४६ सूक्ष्म व लघु उद्योजकांना भूखंड वाटप करण्यात आलेले आहे. तसेच बिडकीन येथे सुमारे २८५ एकर जागा सूक्ष्म व लघु उद्योजकांसाठी राखीव ठेवण्यात आलेली असून, त्यातून आजपर्यंत ५४ लघुउद्योजकांना भूखंड वाटप करण्यात आलेले आहे. आतापर्यंत कंपन्यांची सुमारे १०,६४२ कोटी गुंतवणूक केली असून, ६२ हजार ५६ प्रत्यक्ष लोकांना रोजगार मिळेल, असा दावा केला जात आहे. पण स्थानिकांना यात फारसा वाटा मिळत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी उद्योगमंत्र्यांसमोर केली.

बीडमध्ये भूखंड व्यावसायिकाला मारहाण

युवा सेनेच्या जिल्हाप्रमुखांसह पाच जणांवर गुन्हा

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : बीडमध्ये जुन्या आर्थिक वादातून भूखंड व्यावसायिक कोठारी यांना पट्ट्याने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून अपहरणाचा प्रयत्न करण्यात आल्याच्या घटनेने खळबळ उडाली. या प्रकरणी युवा सेनेचे शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख गणेश शिराळे, अक्षय शिराळे यांच्यासह पाच जणांविरोधात बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला आहे.

बीड शहरात दोन दिवसांपूर्वी रात्री पेट्रोल भरण्यासाठी पंपावर गेलेल्या एका व्यावसायिकाला पाच ते सहा जणांनी अडवून, पट्ट्याने बेदम मारहाण केली आणि दुचाकीवर बसवून पळ काढला. मिळालेल्या माहितीनुसार बीड शहरातील व्यावसायिक महावीर हुकूमचंद कोठारी (वय ५१, रा. उत्तमनगर) हे २२ जुलै रोजी रात्री १०:३० वाजण्याच्या सुमारास जालना रोडवरील हिना पेट्रोल पंपावर दुचाकीत पेट्रोल भरण्यासाठी गेले होते. त्यावेळी जुन्या गाळ्याच्या व्यवहारातील थकीत रकमेच्या वादातून युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश शिराळे, अक्षय शिराळे आणि त्याच्या तीन सहकाऱ्यांनी कोठारी यांना अडवून वाद घातला. संशयितांनी कोठारी यांना शिवीगाळ करत चापट, बुक्क्यांनी आणि कमरेच्या पट्ट्यांनी बेदम मारहाण केली. 'तुला व तुझ्या घरच्यांना सोडणार नाही' अशी धमकी देत त्यांना जबरदस्तीने दुचाकीवर बसवून पळवून नेले.

मात्र, कोठारी यांनी जाधव पेट्रोल पंपाजवळ प्रसंगावधान राखून संशयितांच्या तातडीतून स्वतःची सुटका करून घेतली. या हल्ल्यातील कोठारी यांच्या तक्रारीवरून बीड शहर पोलिसात गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

जायकवाडीचा धरणसाठा ५० टक्क्यांवर

नाशिकमधील पावसाचा आधार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : नाशिकमध्ये गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या पावसामुळे जायकवाडी धरणाची पाणीपातळी ५३ टक्क्यांच्या जवळ पोहोचली आहे. नाशिक, अहिल्यानगरसह जायकवाडीच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या तीन दिवसांपासून चांगला पाऊस झाल्याचे परिणाम आता धरणसाठ्यात होताना दिसू लागले आहेत.

गोदावरीमध्ये जरी पाणी येत असले तरी मराठवाड्यातील इतर धरणांमध्ये पाणीपातळीत फारशी वाढ दिसून येत नाही. लातूरमधील मांजरा धरणात अजूनही १६.२८ टक्के पाणीसाठा आहे. अनेक भागात अजूनही पुरेसा पाऊस पडलेला नाही. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पावसाच्या सरीवर सरी पडत आहेत. मात्र, अजूनही मोठ्या पावसाची प्रतीक्षा आहे. जायकवाडी धरणातील पाणीसाठ्यावर शहरातील पाणी पुरवठ्यासह अनेक गावांची तहान अवलंबून आहे. जूनपर्यंत अपेक्षित सरासरीपेक्षा अधिक पाऊस छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पडला. सर्वात कमी पाऊस लातूर जिल्ह्यात पडला आहे. परभणी जिल्ह्यात अनेक तालुक्यात कमी पाऊस झाल्याने पेरणी करण्यासही अडचणी निर्माण झाल्या आहेत. नाशिक जिल्ह्यात पडलेल्या पावसामुळे दुपारी तीन वाजेपर्यंत ५१ टक्के धरण भरले होते.

हिंगोलीत कर्जमुक्तीसाठी ४४ हजार शेतकरी पात्र

लोकसत्ता वार्ताहर

हिंगोली : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील ६७३ गावांतील ४४ हजार १७७ पात्र शेतकऱ्यांची पहिली लाभार्थी यादी अखेर जाहीर झाली आहे. यादी प्रसिद्ध होताच लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरणासाठी धाव घेतली असून शनिवारी दुपारी अडीच वाजेपर्यंत १३७ शेतकऱ्यांनी प्रक्रिया पूर्ण केली. उर्वरित पात्र शेतकऱ्यांनीही तातडीने आधार प्रमाणीकरण करून योजनेचा लाभ निश्चित करून घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने आहे.

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसंदर्भात माहिती देण्यासाठी आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी शनिवारी भाजपच्या कार्यालयात पत्रकारांची बैठक घेतली व शेतकरी कर्जमाफी संदर्भात सविस्तर माहिती दिली होती.

फॉर्म क्र.१४ [पहा नियमन ३३(२)]

वसुली अधिकारी – १ यांचे कार्यालय,
ऋण वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद

तळ मजला, 'जिवन सुमन', बिल्डींग, प्लॉट क्र.३, एन–५, सिडको, औरंगाबाद–४३१००३

RC/२००/२०२५ **मागणी सुचना** दि. ०६–०७–२०२६
नि.क्र. ०८

बँक आणि वित्तीय संस्था कर्ज वसुली कायदा, १९९३ चे कलम २५ ते २८ आणि आयकर कायदा १९६१ मधील दुसऱ्या परिशिष्टामधील नियम २ अंतर्गत सुचना

बँक ऑफ महाराष्ट्र विरूद्ध **मे. रूद्र कलर होम**

प्रति,

(सीडी १) मे. रूद्र कलर होम मार्फत त्याचे प्रोप्रायटर **प्रकाश विश्वनाथ कोरे,**
रा. विजय कॉलनी, समर्थनगर, जिल्हा लातूर–४१३५१२.

(सीडी २) महादेवी गंगाधर वाघमारे,
रा. सर्व्हे क्र.७०/बी/३ पैकी प्लॉट क्र.८९/पार्ट, आणि सर्व्हे क्र.७०/बी/३ पैकी ग्रा.पं.क्र.१३८१, मौजे खाडगांव, नपा घर क्र.आर–१/२२१५–जुना आणि १५०५५३४ (नवीन), वैभवनगर, शिवाजी शाळे मागे, खाडगांव रोड, लातूर–४१३५१२. **येथे सुद्धा :** विजय कॉलनी, समर्थनगर, जिल्हा लातूर–४१३५१२.

या द्वारे सुचित करण्यात येते की, **मा. पिठासीन अधिकारी, ऋण वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद** यांनी **OA/१४२/२०२४** मधील तुम्हास देय असलेली रक्कम रूपये **३१,३८,७७२.००** (रू.एकतीस लाख अडोतीस हजार सातशे बहात्तर केवळ) अधिक दि.१३/०८/२०२३ पासूनचे भविष्यातील **९%** साध्या दराने वार्षिक व्याज व दंड रक्कम **रू.३४,०००/–** (रू.चौतीस हजार केवळ) साठी जारी केलेल्या वसुली प्रमाणपत्राचे अंमलबजावणीस्तव (एकत्रीतपणे आणि स्वतंत्रपणे/पुर्णपणे/मर्यादित).

२) या द्वारे तुम्हाला निर्देशीत करण्यात येते की, सदरील सुचना प्राप्तीपासून १५ दिवसांचे आंत उपरोक्त नमुद रक्कम अदा करण्यात यावी, यात कसूर केल्यास बँक आणि वित्तीय संस्था यांना देय कर्ज कायदा, १९९३ आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांनुसार वसुली केली जाईल.

३) तुम्हाला या द्वारे आदेशीत केले जात आहे की, पुढील सुनावणीच्या तारखेला किंवा तत्पूर्वी तुमच्या मालमत्तेचा तपशील प्रतिज्ञापत्रावर घोषीत करावा.

४) तुम्हाला या द्वारे आदेशीत करण्यात येते की, पुढील कार्यवाही साठी खालील सही करणार यांचे समोर **दिनाक १२/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता** हजर व्हावे.

५) उपरोक्त नमुद रकमेव्यतिरिक्त तुम्ही पैसे देण्यास जबाबदार असाल :

(अ) प्रमाणपत्र/अंमलबजावणी कार्यवाहीच्या या सूचनेनंतर लगेच सुरू होणाऱ्या कालावधीसाठी देय असलेले व्याज.

(ब) सर्व दंड, शुल्क आणि या सुचनेच्या सेवेच्या आणि वॉरंटच्या आणि प्रक्रियेच्या संदर्भात झालेले खर्च आणि देय रकमेच्या वसुलीसाठी केलेले इतर सर्व खर्च.

दि. ०६/०७/२०२६ रोजी माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने देण्यात आले.
(स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)

स्वाक्षरी/– **(शरद बावीस्कर)**
वसुली अधिकारी–१
ऋण वसुली न्यायाधिकरण, औरंगाबाद

SHREE

बीडमध्ये महिलेचा मृतदेह आढळला

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर: बीड तालुक्यातील पालवन शिवारात एका शेतामध्ये अनोळखी महिलेचा मृतदेह रविवारी (दि. २६ जुलै) सकाळी आढळला.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बीड शहरापासून जवळच असलेल्या पालवन शिवारातील मस्के यांच्या शेतात एका महिलेचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळल्याची माहिती बीड ग्रामीण पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, स्थानिक गुन्हे शाखेचे शिवाजी बंटेवाड, ग्रामीण पोलीस ठाणे निरीक्षक सोमनाथ जाधव यांनी धाव घेतली तसेच फॉरेन्सिक (वैद्यकीय व वैज्ञानिक तपास) पथकही घटनास्थळी दाखल झाले असून पुरावे संकलित करण्याचे काम सुरू आहे. ही हत्या की आत्महत्या, याचा तपास लावण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान असणार आहे.

नांदेड जिल्हा बँकेसाठी मतदान प्रक्रिया सुरळीत!

लोकसत्ता वार्ताहर

नांदेड : नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकांच्या २३ पैकी ११ जागा बिनविरोध निघाल्यानंतर उर्वरित १२ जागांसाठी रविवारी मतदान घेण्यात आले. ही प्रक्रिया सर्वत्र सुरळीतपणे पार पडल्याचे सांगण्यात आले. निवडणुकीची मतमोजणी येत्या मंगळवारी नांदेडमध्ये होणार आहे.

या निवडणुकीच्या निमित्ताने सर्वपक्षीय गटाचे नेतृत्व करणारे खा.अशोक चव्हाण, आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्यासह जिल्ह्यातील काही प्रमुख राजकीय नेते तसेच जिल्हा व तालुकास्तरीय कार्यकर्त्यांनी मतदानाचा हक्क बजावला.

रविवारच्या मतदानानंतर माजी संचालक व ज्येष्ठ नेते बी.आर.कदम, विजयसिंह देशमुख, राजेंद्र केशव तसेच कृष्णा नागेश पाटील, माजी आमदार माधवराव जवळगावकर आणि संगीता विठ्ठल पाटील या प्रमुख उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले. माहूर आणि हिमायतनगर येथे दुपारपर्यंतच १०० टक्के मतदानाची नोंद झाली. या १२ जागांसाठी १३४४ मतदार होते. दुपारी २ पर्यंत ८६ टक्के मतदान झाले होते. बँकेच्या वरील निवडणुकीत पहिल्या टप्प्यात आ.प्रताप पाटील चिखलीकर व त्यांची कन्या प्रणिता, भाजपचे आमदार सर्वश्री भीमराव केराम व डॉ.तुषार राठोड, मारोतराव कवळे गुरूजी, मीनल पाटील खतगावकर हे प्रमुख उमेदवार आपापल्या मतदारसंघात बिनविरोध आले. अ मतदारसंघात नांदेड आणि धर्माबाद या दोन तालुक्यांमध्ये मोठी चुरस असल्याचे दिसून आले. खासदार चव्हाण यांच्या प्रभावक्षेत्रातील चार उमेदवारांना निवडून आणण्यासाठी मोठी यंत्रणा कार्यरत होती.

काँग्रेस खासदारांची भाजपशी हातमिळवणी

काँग्रेसचे खासदार रवींद्र चव्हाण यांनी भाजपा नेत्यांशी तडजोड करून आपले काका श्रीनिवास चव्हाण आणि मामी सुशीलाबाई बेटमोगरेकर यांना पहिल्या टप्प्यात बिनविरोध निवडून आणले होते. त्यांच्या या कृतीवर खालच्या फळीतील तिरूपती कोंढेकर, संदीप देशमुख बारडकर आदी कार्यकर्त्यांनी नापसंती दर्शवत भोकर मुदखेड व अर्धापूर या तीन तालुक्यांत उमेदवार उभे करून लक्ष वेधून घेतले होते. काँग्रेसच्या राज्य सहप्रभारी रिहाना चिश्ती गेल्या आठवड्यात नांदेडमध्ये आल्या असता, या मुद्द्यावरच खासदारांविरुद्ध तक्रार करण्यात आली.

नांदेडमध्ये वाहनांची धडक; एकाचा मृत्यू

नांदेड : हिमायतनगर-भोकर राष्ट्रीय महामार्गावरील सोनारी फाटा येथे भरधाव चारचाकी वाहनाने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोन दुचाकींना जोरदार धडक दिली. ही घटना शनिवारी दुपारी १२ ते १२.३० वाजण्याच्या दरम्यान घडली. या भीषण अपघातात एकाचा मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

हिमायतनगरकडून भोकरच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या चारचाकी (एमएच २६ सीपी ८८६०) ने सोनारी फाटा येथे रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोन दुचाकींना जोरदार धडक दिली. या धडकेत (टीएस १८ जी १८१७) आणि (एमएच २६ बीएस ५२६९) या दोन दुचाकींचे मोठे नुकसान झाले.

या घटनेत सोनारी येथील शेख जिकरान शेख सिराज आणि शेख सोहेल शेख जहीर हे दोघे गंभीर जखमी झाले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने मदत करत जखमींना सरसम येथील प्राथमिक रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर दोघांनाही पुढील उपचारासाठी नांदेडला हलविण्यात आले. मात्र, नांदेडला नेत असताना शेख सोहेल शेख जहीर यांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. तर शेख जिकरान शेख सिराज यांच्यावर नांदेड येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हिमायतनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, बीट जमादार नागरगोजे, बालाजी जाधव, पठाण आदींनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

गतिरोधक कधी बसणार, नागरिकांचा संतप्त सवाल

हिमायतनगर-भोकर राष्ट्रीय महामार्गावर सोनारी फाट्यासह अनेक गावांच्या मुख्य चौकात आणि बसथांब्यांजवळ गतिरोधक बसवावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून मागील अनेक वर्षांपासून केली जात आहे. मात्र, राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

उत्पादक कंपन्यांबरोबरच विविध क्षेत्रांतून ४७.३७ कोटींची करचुकवेगिरी

राज्य वस्तू व सेवा कर विभागाकडून १७ प्रकरणांचा तपास

छत्रपती संभाजीनगर : राज्य वस्तू व सेवा कर विभागाच्या गुप्तवार्ता शाखेने या वर्षी १७ प्रकरणांचा तपास करून ४७.३७ कोटी रुपयांची कथित करचुकवेगिरी उघडकीस आणली. पाच उत्पादक कंपन्यांनी २२.०४ कोटी रुपयांच्या करात अनियमितता आढळून आली. त्यापाठोपाठ बांधकाम क्षेत्रात आठ प्रकरणांमधून २०.३४ कोटी रुपयांची, तर व्यापारी क्षेत्रातील चार प्रकरणांमधून ४.९२ कोटी रुपयांची करचुकवेगिरी समोर आली.

बांधकाम क्षेत्रात सर्वाधिक तपास करण्यात आला. मात्र, खासगी उत्पादक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये कर चुकवेगिरी अधिक असल्याचे दिसून आले. २०२५-२६ या आर्थिक वर्षात तपास कामगिरी अहवालानुसार, जीएसटी विभागाने याच कालावधीत २६.६३ कोटी रुपयांची वसुली केली. त्यापैकी १८.०६ कोटी रुपये रोख स्वरूपात, तर ८.५७ कोटी रुपये इनपुट टॅक्स क्रेडिट समायोजनाद्वारे वसूल करण्यात आले.

उलाढाल लपविणे, इनपुट टॅक्स क्रेडिटचा चुकीचा लाभ घेणे, बनावट बिले तयार करणे, करचुकवेगिरी तसेच जीएसटी कायद्याअंतर्गत होणाऱ्या इतर उल्लंघनांच्या प्रकरणांचा शोध घेत यावर ही कारवाई करण्यात आली.

डिजिटल अटकेची भीती दाखवत ५१ लाखांना गंडवले

नांदेड : वेगवेगळ्या खोट्या कंपन्यांमध्ये पैशांचे व्यवहार आणि दहशतवादाला आर्थिक मदत केल्याचा आरोप करत एका ५६ वर्षीय व्यक्तीला डिजिटल अटक करण्याची धमकी देत फसवणूक केल्याची घटना शहराच्या जुना कौठा भागातील बसवेश्वरनगर येथे १७ ते २४ जुलै दरम्यान घडली. या प्रकरणी सायबर सेल पोलीस विभागाच्या वतीने पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बसवेश्वरनगर जुना कौठा भागातील मोहन लक्ष्मणराव घईनवाड हे आपल्या घरी असताना अज्ञात आरोपींचा त्यांना फोन आला व आरोपींनी आम्ही कार्तिक यादव, आर.के.चौधरी (डेटा प्रोडक्शन बोर्ड, मुंबई), प्रदीप जैस्वाल, विश्वास नांगरे पाटील, सुजल रॉय असे पोलीस दलातील अधिकारी असल्याची बतावणी करत घईनवाड यांना दहशतवाद्यास आर्थिक मदत करत असल्याचे सांगत धमकावले.

या प्रकरणात तुम्हाला डिजिटल अरेस्ट केले जाईल, अशी भीती घईनवाड यांना दाखवली. या भीतीपोटी मोहन घईनवाड यांनी आरोपींना बँकेच्या खात्यातून ऑनलाइन रक्कम ५१ लाख ३४ हजार रुपये पाठवले. काही वेळानंतर त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी या प्रकरणी सायबर पोलीस स्थानकात धाव घेतली व घडलेली हकीकत सांगितली. या प्रकरणी सायबर सेल पोलीस विभागाने पाच आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

लोकसत्ता Classifieds FROM ANYTHING TO EVERYTHING.

यात्रासहल

दोस्तीटूर– चारधामयात्रा, नर्मदा परिक्रमा, कुरवपूर–पिठापुरम, आदिकैलाश, गंगासागर, जगन्नाथपुरी, अयोध्या, त्रिस्थळी, कोस्टल कर्नाटका, केरळ–तामिळनाडू, आसाम–पूर्वांचल, नेपाळ–मुक्तिनाथ, नैनिताल
9429694477/ 9702251584.
0070987728-23

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

---

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट–IV–ए – ई–लिलाव – स्थावर मालमत्तेची जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव-विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय: ९वा मजला, अंत्रिक्ष भवन, २२ कस्तुर्बा गांधी मार्ग, नवी दिल्ली–११०००१, फोन्स: ०११–२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट: www.pnbhousing.com

औरंगाबाद शाखा कार्यालय: ई–१, ई–२ व ई–३, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेन्टर, अदालत रोड, औरंगाबाद–४३१००१, महाराष्ट्र.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. ''ए'' मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या याखालील रकाना नं. ''डी'' मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक/ प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. ''सी''मध्ये वर्णिल्यानुसार) **''मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड''**/ सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशीलानुसार **''जसे आहे जेथे आहे''**, **''जसे आहे जे काही आहे''** आणि **''जे काही आहे तेथे आहे''** या तत्त्वावर करण्यात येणार आहे. ऋणको/ गहाणकार/ विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट रुल्स, २००२ च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. ''ए'' मध्ये दर्शविल्यानुसार, जसे असेल त्यानुसार, संबंधित ऋणको/ गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया **''मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड''/ सुरक्षित धनकोच्या www.pnbhousing.com** या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

लोन नं./ ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार/ विधि वारसदाराचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व तारीख (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (आरपी) (ई)	इरठे (आरपीची १०%) (एफ)	बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरण, जर असल्यास (के)
HOU/ARNG/0622/1000734/ गौरव गणपतराव सोनावणे/ गणपत रंगनाथ सोनावणे/ उषा गणपत सोनावणे– शाखा कार्यालय: औरंगाबाद	**रु.२३,०३,२६४.१२ व ०६.०६.२०२५ रोजीप्रमाणे**	भौतिक ताबा	फ्लॅट नं. ०९, गट नं. १३८ (पार्ट), दुसरा मजला, बिल्डिंग नं. सी–१, ''कल्याणी साई विश्व'', सावंगी, ता. व जि. औरंगाबाद, औरंगाबाद–४३१००१, महाराष्ट्र, भारत.	रु. २,२४८,०००/–	रु. २,२४,८००/–	२६.०८.२०२६	रु. १०,०००/–	०६.०८.२०२६ रोजी दु. १२.०० व दु. ०४.०० दरम्यान	२७.०८.२०२६ रोजी दु. ०२.०० व दु. ०३.०० दरम्यान	ज्ञात नाही

* त्याकरिता वसुली आणि/ किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत निघालेले लागू असल्याप्रमाणे १८% प्र. व. दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ. सह एकत्रित. ** ''पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड''च्या प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार रकाना **क्र. ''के'' मध्ये जे काही प्रकट केले आहे ते वगळता वर नमूद केलेल्या स्थावर/ सुरक्षित मत्तेवर तेथे कोणतेही भार/ दावे नाहीत. याअधिक, सदर भार यशस्वी खरीददार/ बोलीदाराद्वारा, त्याच्या/ तिच्याकडील, सोसावयाचे आहेत/ प्रदान करावयाचे आहेत. भावी खरीददार/ बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्तेवरील नमूद केलेल्या भाराची स्वतंत्ररीत्या पडताळणी करून निश्चित करावेत.** (१.) आजच्या तारखेनुसार, तेथे वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मत्तेची विक्री करणे, अभिहस्तांतरण आणि/ किंवा वासलात लावणे यापासून ''पीएनबीएचएफएल''ला/ ''पीएनबीएचएफएल''च्या प्राधिकृत अधिकारींना प्रतिबंध करण्यास कोणताही आदेश आणि/ किंवा निषेधाज्ञा आलेली नाही आणि/ किंवा वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मत्तेची वासलात आणि दर्जा रकाना क्र. ''के'' मध्ये नमूद करण्यात आले आहे. (२.) भावी खरीददार/ बोलीदार आणि स्वारस्य असलेले पक्षकार रकाना नं. ''के'' मध्ये नमूद केलेली व मंजूर केलेली प्रक्रिया/ आदेश इ., जर असल्यास, त्यामधील याचिकांबाबत तपासणी स्वतः स्वतंत्रपणे करू शकतील. समाविष्ट परंतु त्याकरिता ''पीएनबीएचएफएल''कडे उपलब्ध असलेल्या संबंधित नामाधिकाराच्या कागदपत्रांचे नामाधिकार मर्यादित नाहीत आणि निविदा/ बोली अर्ज प्रपत्र किंवा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्यावे. बोलीदाराने बोली प्रपत्रासमवेत या लिलावाच्या शर्ती व अटी स्वाक्षरीकृत करून घ्यावयाच्या आहेत. (३.) कृपया नोंद घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(३)च्या अनुसार, बोलीदार/ खरीददाराने त्याचदिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी विक्री किमतीच्या (इसारा रक्कम समाविष्ट, जर भरलेली असल्यास) २५% ठेव, कायदेशीररीत्या बांधील असलेली, भरावयाची आहे. विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(२) च्या अनुसार सुरक्षित धनकोद्वारा विक्री किमतीच्या २५% रकमेच्या स्वीकृतीनंतरच केवळ बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री विचाराधीन उर्वरित रकमेच्या ७५% विक्री निश्चितीकरण पत्राच्या अभिस्वीकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरीददाराद्वारा भरावयाची आहे आणि सदर ठेव भरण्यात कसूर झाल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्री निश्चितीकरण पत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांचा अनिवार्य कालावधी संपण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्री निश्चितीकरण रकमेचा भागशः प्रदान जप्त करतील आणि मालमत्ता/ सुरक्षित मत्ता सरफेसी ॲक्टच्या तरतुदींच्या अनुसार पुन्हा विक्रीकरिता ठेवण्यात येईल. (४.) **सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ई-लिलावाद्वारा विक्रीच्या आयोजनात प्राधिकृत अधिकारीस सहाय्य करणार आहे. तिचे कॉर्पोरेट कार्यालय येथे असलेले- प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरयाणा–१२२००३ वेबसाइट- www.bankeauctions.com बोली कागदपत्रे प्राप्त करणे किंवा मालमत्तेच्या पाहणीसंबंधित कोणत्याही सहाय्याकरिता आणि कोणत्याही अन्य शंकांकरिता किंवा नोंदणीकरिता तुम्हास गणेश अंकुश/ निलाक्षी पाटील- टोल- फ्री नं.: १८०० १२० ८८००, ई-मेल: auction@pnbhousing.com, जी ''पीएनबीएचएफएल''ची अधिकृत व्यक्ती आहे, यांच्याशी समन्वय साधावयाचा आहे किंवा www.pnbhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी.**

स्थळ: औरंगाबाद, दिनांक: २७.०७.२०२६

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

---

homefirst We'll take you home

Home First Finance Company India Limited
CIN: L65990MH2010PLC240703 Website: homefirstindia.com
Phone No.: 180030008425 Email ID: loanfirst@homefirstindia.com

ताबा सूचना

संदर्भ : सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८ च्या सब–रुल (१) अंतर्गत ताबा सूचना

ज्याअर्थी, **होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड**चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी संबंधित सूचनांच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत थकित देणींच्या प्रदानाकरिता खालील नमूद केलेल्या तुमच्या नावे / ऋणकोंवर फर्माविणारी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२ चा ॲक्ट नं. ५४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली दिल्यानुसार त्यांच्या संबंधित तारखांदिवशी मागणी सूचना निर्गमित करण्यात आली आहे. तुम्ही / सर्व ऋणको, तथापी, विनिर्दिष्ट वेळेत उक्त थकित देणींचे प्रदान करण्यास असमर्थ ठरला आहात, म्हणून **होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड**ने सरफेसी ॲक्ट, २००२च्या सेक्शन १३च्या सब–सेक्शन (४)च्या आणि त्याखालील वाचलेल्या रुलसच्या तरतुदीअंतर्गत प्रदान केल्यानुसार असलेले हक्क आणि अंमलबजावणीत याखाली नमूद केल्यानुसार सुरक्षित मत्तेचा **ताबा** घेतला आहे.

अनु. क्र.	ऋणको/ सह–ऋणको/ हमीदारांची नावे	गहाणवट मालमत्तेचे वर्णन	मागणी सूचनेची तारीख	मागणी सूचनेच्या तारखेनुसार एकूण थकित रक्कम (आयएनआरमध्ये)	ताब्याची तारीख
1.	राजू गायकवाड, शोभा राजू गायकवाड	रो हाऊस – ब्लॉक नं. ४, प्लॉट नं. ६०, गॅट नं. २१८, ब्लॉक नं. ४ (पूर्वेकडील बाजूचा पार्ट), प्लॉट नं. ६०, गॅट नं. २१८, जी. पी. शिर्सोली, जळगाव, महाराष्ट्र – ४२५००२. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्वेच्या दिशेने : प्लॉट नं. ६१, पश्चिमेच्या दिशेने : लगतचा ब्लॉक नं. ०३, उत्तरेच्या दिशेने : रोड, दक्षिणेच्या दिशेने : लगतचा प्लॉट नं. ५८ व ५९.	15.03.2026	7,51,940	22.07.2026
2.	सोपान लहू कोळी, अनिता सोपान कोळी, लहू नागो कोळी	रो हाऊस – प्लॉट नं. ६, ब्लॉक नं. बी, प्लॉट नं. ४७ ते ५२/६, शेत गॅट नं. १२१/ए/३, निमखेडी खूर्द, प्लॉट नं. ४७ ते ५२/६, शेत गॅट नं. १२१/ए/३, निमखेडी खूर्द, जळगाव, महाराष्ट्र – ४२५००१. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्वेच्या दिशेने : प्लॉट ४७ ते ५२/७, पश्चिमेच्या दिशेने : सदर प्लॉट नं. ४७ ते ५२/६ मधील ब्लॉक नं. "ए", उत्तरेच्या दिशेने : कॉलनी रोड, दक्षिणेच्या दिशेने : प्लॉट नं. ४१ ते ४६.	03.10.2024	5,45,292	21.07.2026

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणको/ हमीदार तसेच आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी वर नमूद केलेल्या तारखेदिवशी उक्त रुलच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्याला/ तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. **ऋणको/ हमीदार** तसेच **आम जनतेस** याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी वरील संदर्भित मालमत्ता/ सुरक्षित मत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागासंबंधित व्यवहार करू नये आणि उक्त मालमत्ता / सुरक्षित मत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार मालमत्ता/ सुरक्षित मत्तेच्या अनुसार यावरील नमूद केलेल्या रकमेकरिता **होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड**च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे, **जी रक्कम पूर्णतः प्रदान होईपर्यंत त्यावरील पुढील व्याजासह देय आहे.**
सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत.

स्थळ : जळगाव दिनांक : २७.०७.२०२६

प्राधिकृत अधिकारी, होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड

निडो होम फायनान्स लिमिटेड

nido HOME FINANCE

(आधी एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)
नोंदणीकृत कार्यालय येथे आहे टॉवर ३, ५वा मजला, विंग 'बी', कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई– ४०००७०.
प्रादेशिक कार्यालय येथे: कार्यालय क्र. ४०७–४१०, ४था मजला, काकडे बिझ आयकॉन, सीटीएस २६८७बी, गणेशखिंड रोड, भांबुर्डे, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र– ४११०१६.

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी) [नियम ८(१)]

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार हे **मे. निडो होम फायनान्स लिमिटेड** यांचा (आधी एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) अधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट [ॲक्ट], २००२ (५४, २००२) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियम, २००२ च्या [नियम ३] सहवाचता निर्देशित कलम १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून **मागणी सूचना दिनांकित १५.०५.२०२६ जारी केली ज्यात कर्जदार/ सह–कर्जदार अर्जुन किशोर खेताडे (कर्जदार), शकुंतला किशोर केतडे (सह–कर्जदार), किशोर शिवाजी खेताडे (सह–कर्जदार) यांना सूचनेत नमूद केलेली रक्कम रु. १२,११,२२०.१०/– (रुपये बारा लाख अकरा हजार दोनशे वीस आणि दहा पैसे फक्त) दि. १५.०५.२०२६** रोजीनुसार थकीत आणि देय असलेली रक्कम सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, त्यावरील सर्व खर्च, शुल्क, इत्यादींसह सदर रक्कम पूर्णपणे भरेपर्यंत एकत्रित असलेली परत करण्याचे आवाहन केले होते.

कर्जदार यांनी रक्कम परतफेड न केल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की, निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियम, २००२ च्या नियम ८ सहवाचता कायद्याच्या कलम १३ च्या उप–कलम (४) अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या **मालमत्तेचा वर्ष २०२६ च्या जुलै महिन्याच्या २५ व्या दिवशी रचनात्मक ताबा घेतला** आहे.

याद्वारे कर्जदारास, विशेषतः, आणि सर्वसामान्य जनतेस, मालमत्तेचा कोणताही व्यवहार न करण्याची सूचना देण्यात येत आहे आणि मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार हा **रु. १२,११,२२०.१०/– (रुपये बारा लाख अकरा हजार दोनशे वीस आणि दहा पैसे फक्त) आणि त्यावरील व्याज यासाठी मे. निडो होम फायनान्स लिमिटेड (आधी एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)** यांच्या शुल्काच्या विषयाधीन असेल.

तारण ठेवलेल्या मालमत्तेची परतफेड करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष निर्देशित कायद्याच्या कलम १३ च्या उप–कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जात आहे.

मालमत्तेचे वर्णन

फ्लॅट क्र. ८अ क्षेत्रफळ बिल्ट अप क्षेत्रफळ ३५.३१ चौ. मी. (३८० चौ. फूट), तिसऱ्या मजल्यावर (स्टील्ट दुसरा) 'गजानन पार्क' नावाने ओळखल्या जाणाऱ्या, बांधलेल्या इमारतीमध्ये प्लॉट क्र. १३ वर बांधलेले ज्याचे क्षेत्रफळ मोजमापे ३००.०० चौ. मी. आहे, सर्वेक्षण क्र. २२६/बी/१ यामध्ये, नाशिक महानगरपालिका हद्दीतील आणि नोंदणी व उपनोंदणीच्या आतील येथे मौजे अंबड खुर्द तालुका– जि. नाशिक– ४२२०१० यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, ज्याच्या **सीमा खालीलप्रमाणे:** पूर्व: सीमावर्ती जागा, पश्चिम: फ्लॅट क्र. ८ब, दक्षिण: सीमावर्ती जागा, उत्तर: फ्लॅट क्र. ६.

दिनांक: २५.०७.२०२६
ठिकाण: नाशिक

सही/– अधिकृत अधिकारी
निडो होम फायनान्स लिमिटेड यांच्यासाठी
(आधी एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)

जाहीर सूचना

(भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळ, २०१६ च्या कलम १०२ अंतर्गत)

श्री. महेंद्र सुंदरलाल कुमावत वैयक्तिक हमीदार/ ऋणको यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

सविस्तर तपशील		
१.	**वैयक्तिक हमीदाराचे नाव**	श्री. महेंद्र सुंदरलाल कुमावत
२.	**वैयक्तिक हमीदाराचा पत्ता**	ॲट अँड पोस्ट नालेगाव, ता. वैजापूर, व्हीटीसी नालेगाव, जिल्हा औरंगाबाद, महाराष्ट्र – ४२३७०३.
३.	**अर्ज दाखल करून घेण्याच्या आदेशाचा तपशील**	एसएस कॉट्ट जिन प्रायव्हेट लिमिटेडचे, कॉर्पोरेट ऋणकोचे श्री. महेंद्र सुंदरलाल कुमावत, वैयक्तिक हमीदार यांच्या विरोधात नादारी ठराव प्रक्रिया दाखल करून घेणारी कंपनी विनंतीअर्ज धारण केलेला सीपी (आयबी) नं. ३४९/ एमबी/ २०२६ मधील आदेश ०८.०७.२०२६ रोजी माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई बेंचद्वारा घोषित केला होता. तथापी, दिनांकित १३.०७.२०२६ सुधारित आदेश २१.०७.२०२६ रोजी अपलोड केलेला होता.
४.	**आयबीसी, २०१६ अंतर्गत वैयक्तिक हमीदारासंबंधित नादारी प्रक्रिया सुरू होणारी तारीख**	०८.०७.२०२६
५.	**ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत असलेले नादारी व्यावसायिकाचे नाव व नोंदणी क्रमांक**	**नाव :** श्री. विनीत गंगवाल **नोंदणी क्रमांक :** IBBI/IPA-002/IP-N00091/2017-18/10235
६.	**मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार ठराव व्यावसायिकाचा पत्ता व ई–मेल आयडी**	**पत्ता :** ऑफिस न. ५०३, वरूण कॅपिटल, सीटीएस नं. ३६४+३६५/१३, जे एम रोड लगत, भारत पेट्रोलियम लेन, सिटीओटेलच्या पुढे, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र – ४११००५. **ईमेल आयडी :** ip.vinitgangwal@sudharman.in
७.	**ठराव व्यावसायिकाशी पत्रव्यवहार करण्याकरिता आणि दाव्याच्या सादरीकरणाकरिता वापरावयाचा पत्ता व ई–मेल आयडी**	**पत्ता :** संकल्प रेझोल्युशन प्रोफेशनल्स, ५०४, ५वा मजला, दि सेंट्रल बिल्डिंग, शेल कॉलनी रोड, चेंबूर (पूर्व), मुंबई – ४०००७१. **ईमेल आयडी:** pirp.mahendrakumawat@sankalp-ipe.com
८.	**दाव्यांच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख**	१५ ऑगस्ट, २०२६
९.	**संबंधित फॉर्म्स यावर उपलब्ध आहेत :**	https://ibbi.gov.in//en/home/downloads

सूचना याद्वारा देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई बेंचने ०८.०७.२०२६ रोजी श्री. महेंद्र सुंदरलाल कुमावत, वैयक्तिक हमीदार यांची नादारी ठराव प्रक्रिया सुरू करण्यास आदेश दिला आहे. श्री. महेंद्र सुंदरलाल कुमावत यांच्या धनकोंना याद्वारा एन्ट्री नं. ७ च्या अनुसार नमूद केलेल्या पत्त्यावर ठराव व्यावसायिकाकडे भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट ऋणकोंच्या वैयक्तिक हमीदारांकरिता नादारी ठराव प्रक्रिया) विनियम, २०१९ च्या विनियम ७(१) अंतर्गत विहित पत्रात **"फॉर्म बी"** मध्ये १५ ऑगस्ट, २०२६ रोजी किंवा तत्पूर्वी त्यांचे दावे सादर करण्यास फर्माविण्यात आले आहे. धनको ईलेक्ट्रॉनिक प्रणालीत किंवा कुरिअर, स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर्ड लेटरद्वारा त्यांचे दावे सादर करतील. खोटे किंवा दिशाभूल करणाऱ्या दाव्यांचे सादरीकरण झाल्यास दंड आकारला जाईल.

श्री. विनीत गंगवाल
श्री. महेंद्र सुंदरलाल कुमावत यांचे ठराव व्यावसायिक
नोंदणी क्र. : IBBI/IPA-002/IP-N00091/2017-18/10235
एएफए प्रमाणपत्र क्र. : AA2/10235/02/300627/204309

दिनांक : २५.०७.२०२६
स्थळ : मुंबई